प्रेस नोट दिनांक १९/०४/२०२३

**तहसीलदार कार्यालय रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी येथील मंडळ अधिकारी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडलेबाबत..**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | - |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. अमित जगन्नाथ चिपरीकर, वय.३९ वर्षे, मंडळ अधिकारी, खेडशी ता. जि. रत्नागिरी |
| मागितलेली लाचेची रक्कम | ४५,०००/-रुपये |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | ३१,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे जमिन खरेदी विक्री व जमिन विकासाची कामे करीत असुन त्यांचे एक पक्षकार यांचे नावावर असलेल्या जमिनीचा सात बारा उतारा ऑनलाईन प्रमाणित दिसत नसल्याने सदरचा सातबारा उतारा दुरुस्त करण्याचा प्रस्ताव तहसिलदार रत्नागिरी यांना पाठविल्याचा मोबदला म्हणुन व तहसीलदार यांचेकडुन आदेश प्राप्त झाल्यानंतर फेरफारला दुरुस्ती करणेकरीता मंडळ अधिकारी श्री.चिपरीकर यांनी १०,०००/- रुपयांची लाच रक्कमेची मागणी केली तसेच त्यांचे इतर दोन पक्षकार यांनी खरेदी केलेल्या भुखंडाचे सातबारा उता-यावर घेण्यात आलेल्या फेरफार नोंदी मंजुर करणेकरीता एक सातबारा उता-याचे ५,०००/-रुपये प्रमाणे एकुण ०७ सातबारा उता-याचे ३५,०००/-रुपये असे फेरफार दुरुस्तीचे १०,०००/-रुपये व फेरफार नोंद मंजुरीचे ३५,०००/-रुपये असे एकुण ४५,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. चिपरीकर यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी येथे दिनांक १९/०४/२०२३ रोजी लाच रक्कमेच्या मागणीची तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १९/०४/२०२३ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक श्री. चिपरीकर, मंडळ अधिकारी खेडशी यांनी तक्रारदार यांचेकडे फेरफार दुरुस्तीचे १०,०००/-रुपये व फेरफार नोंद मंजुरीचे प्रत्येकी ३,०००/-रुपये प्रमाणे २१,०००/-रुपये असे एकुण ३१,०००/-रुपये लाच रक्कमेची मागणी केली असल्याचे पडताळणीत निष्पन्न झालेले आहे.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार तक्रारदार यांचे पक्षकारांचे फेरफार दुरुस्तीचे १०,०००/-रुपये व फेरफार नोंद मंजुरीचे प्रत्येकी ३,०००/-रुपये प्रमाणे २१,०००/-रुपये असे एकुण ३१,०००/-रुपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन दिनांक १९/०४/२०२३ रोजी १९.४२ वाजता रिलायन्स मार्ट समोरील सिध्दीविनायक इमारतीचे पार्कीगमध्ये पंचासमक्ष स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी- १. मा. श्री. सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**२.मा. श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, परिक्षेत्र ठाणे.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र विभाग यांचेशी संपर्क करावा.**

---

संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१

संकेतस्थळ - **acbmaharashtra@mahapolice.gov.in**

**Email - spacbthane@mahapolice.gov.in**

ॲप्लीकेशन- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि नंबर- १०६४/ दुरध्वनी क्रमांक- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉट्सॲप क्रमांक - ९९३०९९७७००

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते
RATNAGIRI

**(सुशांत बं. चव्हाण)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.**